बृहन्मुंबई महानगरपालिका
लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय, शीव, मुंबई – 22.
लोटिरु/8334/वआ दि.16.06.2025.

## जाहिरात

लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय यांच्या वरिष्ठ आस्थापनेवरील **आहारतज्ञ** संवर्गातील ०1 रिक्त पद दि. ०१.०९.२०२५ ते ३१.०३.२०२७ पर्यंत कंत्राटी पध्दतीने भरण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावरुन आहारतज्ञ पदाकरीता असलेल्या अर्जाच्या नमुन्याची प्रत (Print) घेऊन लोटिमस रुग्णालय, कॉलेज इमारत, तळ मजला, रोखपाल विभागात (रुम नं १५) येथे रु. 790/- + 18% जीएसटी रु 143/- =एकूण 933/- इतके शुल्क दि. १९.०६.२०२५ ते ३०.०६.२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत ( सर्व शनिवार तसेच रविवार व सार्वजनिक सुट्टी वगळून) सकाळी 11:00 ते दुपारी 2:30 वाजेपर्यंत भरुन, त्याची मूळ पावती अर्जासोबत जोडून पूर्ण भरलेला अर्ज सोबत शैक्षणिक अर्हतेची सर्व कागदपत्रे जोडून लो.टि.म.स. रुग्णालयाच्या आवक/जावक विभागात दि. ०१.०७.२०२५ पर्यंत सादर करावा.

| अनु.क्र. | पदाचे नाव | एकूण पद | ठोक मानधन (प्रति माह) |
|---|---|---|---|
| १ | आहारतज्ञ | १ | रु.२५,०००/- |

खालील नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हता व अटींची पुर्तता करणा-या इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

**शैक्षणिक अर्हता-**

1. उमेदवाराने मान्यताप्राप्त विद्यापीठातून विज्ञान शाखेतील होमसायन्स/ न्युट्रीशन/ डायटेटिक्स विषय घेऊन पदवी उत्तीर्ण होणे आवश्यक आहे आणि त्याने मान्यताप्राप्त विद्यापीठाची/ संस्थेची डायटेटिक्स / न्युट्रीशन मधील पदव्युत्तर पदवी (एम.एस.सी.) परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

   **किंवा**

   उमेदवाराने मान्यताप्राप्त विद्यापीठातून विज्ञान शाखेतील होमसायन्स/ न्युट्रीशन/ डायटेटिक्स विषय घेऊन पदवी उत्तीर्ण होणे आवश्यक आहे आणि त्याने मान्यताप्राप्त विद्यापीठाची/ संस्थेची डायटेटिक्स / न्युट्रीशन मधील पदव्युत्तर पदविका (पी.जी.डी.)उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

   **(पदवी,पदव्युत्तर पदवी/पदव्युत्तर दुरस्थ शिक्षणाद्वारे प्राप्त केलेली नसावी.)**

2. उमेदवाराकडे किमान १०० खाटा असणा-या नामांकित रुग्णालयातील आहार नियोजनाचा ०३ वर्षाचा अनुभव असावा. बृहमुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयात आहारतज्ञ म्हणून प्रशिक्षण घेतलेल्या पूर्ण केलेल्या उमेदवारांचा सदर प्रशिक्षण

कालावधीसुध्दा अनुभव म्हणून ग्राह्य धरुन त्यांना निवडीसाठी प्राधान्याने विचार केला जाईल.

३. नोंदणीकृत आहारतज्ञांना प्राधान्य दिले जाईल.

**निवडीचे निकष –**

१. सदर पदाची विहित केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव व मुलाखतीच्या प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारे उमेदवारांची निवड यादी तयार करण्यात येईल.

२. मुलाखतीचे ठिकाण,दिनांक व वेळ अर्जदाराने अर्जात नमूद केलेल्या Email ID वर दोन दिवस आधी कळविण्यात येईल. त्यामुळे Email ID अर्जात स्पष्ट नमूद करावा.

**सर्वसाधारण अटी व शर्ती**

१. कंत्राटी कर्मचा-यांना देण्यात येणारे ठोक मानधन व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचा महागाई भत्ता, घरभाडे भत्ता इत्यादी अनुज्ञेय असणार नाही.

२. त्यांच्या कंत्राटी सेवेच्या कालावधीमध्ये दर ९० दिवसापूर्वी एक दिवसाचा सेवा खंड देण्यात येईल.

३. उमेदवारास नियुक्त केलेल्या विभागातील कामाच्या वेळेनुसार तीनही पाळीत काम करावे लागेल. तसेच नियमानुसार साप्ताहिक रजा व एका कॅलेंडर वर्षाला १५ नैमत्तिक रजा अनुज्ञेय असेल या व्यतिरिक्त इतर कोणतीही रजा अनुज्ञेय असणार नाही.

४. कंत्राटी कालावधीत त्यांचे काम समाधानकारक न आढळल्यास त्यांना कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची सेवा समाप्त केली जाईल अथवा, त्यांनी सादर केलेल्या करारनामाचा भंग केल्यास अथवा पालन न केल्यास त्याक्षणी तात्काळ त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

५. सदर नेमणूक ही करार पध्दतीने असल्याने त्यांना त्यांच्या नेमणूक संबंधी कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाही.

६. बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा नियमावली नुसार ही नेमणूक झाली नसल्यामुळे त्या अनुषंगाने मिळणारे निवृत्ती वेतन, भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणत्याही प्रकारचे लाभ मिळण्यास ते पात्र राहणार नाही.

७. नियुक्तीचे वेळी उमेदवाराकडून रु. ५००/- बॉड पेपर वर करारनामा करुन घेण्यात येईल.

८. ते दररोज नियमाने हजेरी पटावर त्यांच्या कर्तव्याच्या वेळेनुसार स्वाक्षरी/बायोमेट्रीक करतील अन्यथा त्यांना गैरहजर धरण्यात येईल. त्यांची विना परवानगी गैरहजेरी विना वेतनी गैरहजेरी करण्यात येईल.

९. उमेदवाराने पोलीस नाहरकत प्रमाणपत्र नियुक्ती दिनांकापासून १५ दिवसांच्या आत सादर करावे.

१०. सरळसेवने सदर पद उपलब्ध झाल्यास कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या उमेदवाराची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

**वयोमर्यादा** – उमेदवाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा जास्त असता कामा नये.

**विशेष सुचना :**

अ) यापूर्वी संबंधित कार्यालयात व अन्य ठिकाणी सादर केलेले /प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही याची कृपया नोंद घ्यावी.

आ) अर्जाचे विहित मुल्य भरुन त्याची पावती जोडल्याशिवाय अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

**सही/- दि. १४.०६.२०२५**

**अधिष्ठाता**

**लो.टि.म.स. रुग्णालय**

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## लो.टी.म. वैद्यकीय महाविद्यालय व सर्वसाधारण रूग्णालय, शीव, मुंबई 400022

## दूरध्वनी क्रं. – 02224066381-89

## अर्जाचा नमुना

पदाचे नाव: ____________________________________

प्रति,
अधिष्ठाता,
लो.टी.म. वैद्यकीय महाविद्यालयव
सर्वसाधारण रूग्णालय, शीव,
मुंबई – 400022.

बृहन्मुंबई महानगरपालिकेत लो.टी.म.स. वैद्यकीय महाविद्यालय व सर्वसाधारण रूग्णालय, शीव, मुंबई 400022 मध्ये ___________________________________पदाकरिता दिनांक ____________ च्या जाहिरातीनुसार मी खाली सही करणार विनंती अर्ज करत आहे.

माझी सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे :

1) (अ) संपूर्ण नाव (आडनाव प्रथम) :

__________________________________________________________

__________________________________________________________

2) पत्ता (कायमचा) :

__________________________________________________________

__________________________________________________________

__________________________________________________________

3) पत्ता

(पत्रव्यवहाराचा) :_______________________________________________

_______________________________________________________

______________________________________________________

4) पदाचे नाव ________________________पदाचा संकेतांक ________________

5) जन्म दिनांक: ______________________________

6) वजन: ________________ किलो उंची: ___________________ सें.मी.

7) वय: ____________

8) शैक्षणिक अर्हता: ______________________________________________

9) ईमेल आयडी: ___________________________

10)मोबाईल नंबर: __________________________

मी यान्वयेप्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो / करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून, ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांवर व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. त्यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास माझी काहीही तक्रार राहणार नाही.

सोबत : प्रमाणपत्रांच्या प्रमाणित प्रतिलिपी

आपला / आपली विश्वासू,

अर्जदाराची सही
(अर्जदाराचे नाव)

दिनांक:

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## लो.टी.म. वैद्यकीय महाविद्यालय व सर्वसाधारण रूग्णालय, शीव, मुंबई 400022

## वैयक्तिक माहितीपत्र (BIO-DATA)

1) संपूर्ण नाव (आडनांव प्रथम) मराठीत:

____________________________________________________________

2) वडिलांचे संपूर्ण नाव:

____________________________________________________________

3) विवाहापूर्वीचे संपूर्ण नाव (महिलांकरिता):

____________________________________________________________

4) पत्ता (कायम निवासस्थान):

____________________________________________________________

5) लिंग– पुरुष ______________स्त्री _________________

6) जन्मदिनांक: दिनांक______ महिना________ वर्ष ________

दिनांक ____________रोजी असलेले वय ________ महिने _______ दिवस____

7) शैक्षणिक अर्हता:

| शैक्षणिक अर्हता | शालांत परीक्षा मंडळ/विद्यापीठाचे नाव | गुणांचा तपशील | | | उच्च माध्यमिक शालांत परीक्षेतील गुण | | उमेदवार किती प्रयत्नात परीक्षा उत्तीर्ण झाला |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्राप्त गुण | पैकी | टक्केवारी | मराठी | इंग्रजी | |
| दहावी | | | | | | | |
| बारावी | | | | | | | |
| पदवी | | | | | | | |
| पदविका | | | | | | | |
| पदव्युत्तर | | | | | | | |
| फेलोशिप | | | | | | | |

8) अनुभव:

____________________________________________________________

9) स्थानिक पोलीस ठाण्याचा पूर्ण पत्ता:

____________________________________________________________

10) उंची: ___ फूट __ इंच, वजन: _____ कि.ग्रा., शरीराची ठेवण: किरकोळ / मध्यम / सुद्रुढ वर्ण: ________ नेत्र वर्ण: ________ वैयक्तिक खून:________________

11) संगणकविषयक ज्ञान: MS-CIT किंवा शासनाने विहित केलेल्या संगणक विषयक अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र: आहे / नाही

12) उमेदवार सध्या नोकरी करीत आहे किंवा नाही ? होय / नाही

असल्यास त्याबाबतचा तपशील:

____________________________________________________________

____________________________________________________________

13) ईमेल आयडी: ___________________________

14)मोबईल नंबर: ____________________________

15) उमेदवाराविरुद्ध पोलीस चौकशी / न्यायालयिन प्रकरण प्रलंबित / प्रस्तावित आहे का ? असल्यास त्याबाबतचा तपशील द्यावा. होय / नाही

16) उमेदवारास पूर्वी शिक्षा झाली होती का ? शिक्षा झाली होय / नाही असल्यास, शिक्षेचा तपशील नमूद करण्यात यावा व न्यायालयीन निर्णयाची प्रमाणित प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी.

आपला / आपली विश्वासू,

अर्जदाराची सही
(अर्जदाराचे नाव)

दिनांक: